MHBH090013232022

**एम.जे.सी.नं.54 / 2022**
**दिलीप + 2 –वि.– निरंक**

## निशाणी क्र.01 खालील आदेश
(पारित दि.10 / 04 / 2023)

1. अर्जदार नं. 1 ते 3 यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, 1827 नुसार कलम 2 आणि 3 प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

2. अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे असे आहे की, श्रीमती पार्बताबाई महादेव मते, रा. खैरलांजी, ता. तुमसर, जि. भंडारा हिचा दि. 19 / 01 / 2022 ला मृत्यू झाली. अर्जदार नं.1 हा मयताचा मुलगा, अर्जदार नं. 2 व 3 हे मुली आहेत. मयताचा पती महादेव दशरथ मते हे पोलीस विभागात कार्यरत असतांना दिनांक 03 / 07 / 1997 ला मृत्यू पावले. त्याच्या मृत्यू पश्चात त्याची पत्नी श्रीमती पार्बताबाई महादेव मते ही पेंशनधारक होती व शासनाकडून पेंशन मिळत होती. ती सुध्दा मृत्यू पावली. अर्जदार हे मयत श्रीमती पार्बताबाई महादेव मते हिचे कायदेशीर वारसदार आहेत व त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. मयत श्रीमती पार्बताबाई महादेव मते ही मृत्यू पावल्यानंतर तिच्या मृत्यूपश्चात सातव्या वेतन आयोगानुसार पेंशनच्या फरकाची रक्कम मिळण्यासाठी अर्जदारांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणून, अर्जदार नं.1 ते 3 हे मयत श्रीमती पार्बताबाई महादेव मते हिचे कायदेशीर वारस आहेत असे प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

3. अर्ज दाखल केल्यानंतर न्यायालयाने दिनांक 26/11/2022 रोजीच्या 'पुण्य नगरी' या वर्तमानपत्रामध्ये जाहिर प्रकटन निशाणी 20 प्रमाणे प्रसिध्द करुन आणि जाहीरनाम्याची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा, तहसिल कार्यालय तुमसर, ग्राम पंचायत कार्यालय, दिवाणी न्यायालय तुमसर आणि मयताच्या घराच्या समोरील दारास नोटीसची प्रसिध्द करुन हरकती मागविल्या. परंतु कुणीही कोणत्याही प्रकारे कोणतीच हरकत अर्जदारांच्या अर्जाला घेतली नाही.

4. अर्जदारांसाठी अर्जदार नं.1 दिलीप महादेव मते याने निशाणी 12 वर त्याचे सरतपासणीचे शपथपत्र दाखल केले आहे. त्याने त्याच्या शपथपत्रात नमूद केले की, श्रीमती पार्बताबाई महादेव मते ही त्याची आई आहे. अर्जदार क्र. 2 व 3 हया बहिणी आहेत. ते सर्व मिळून मौजा खैरलांजी येथे राहत होते. मयत श्रीमती पार्बताबाई महादेव मते हे मौजा खैरलांजी येथे दिनांक 19/01/2022 ला मरण पावली. अर्जदार हे मयत श्रीमती पार्बताबाई महादेव मते हिचे कायदेशीर वारसदार आहेत. अर्जदारांना मयताच्या सातव्या वेतन आयोगानुसार पेंशनच्या फरकाची रक्कम मिळवायची आहे. सदर शपथेवरील म्हणण्याच्या पृष्ठयार्थ त्याने अभिलेखावर श्रीमती पार्बताबाई महादेव मते यांचे मृत्यू प्रमाणपत्र (निशाणी 13), अर्जदाराच्या वडीलाचा नगर परिषदचा मृत्यूचा दाखला (निशाणी 14), सरपंच, ग्रामपंचायत खैरलांजी यांनी दिलेले मयताचे वारसान प्रमाणपत्र (निशाणी 15), जिल्हा कोषागार, भंडारा यांचे पत्र (निशाणी 16), अर्जदार नं. 1 ते 3 यांच्या आधार कार्डाच्या सत्यप्रती (निशाणी 17 ते 19) अभिलेखावर दाखल केलेत. त्या कागदपत्रांचा अवलोकन केले असता असे दिसते की, श्रीमती पार्बताबाई महादेव मते हे दिनांक 19/01/2022 रोजी मयत झाली. त्यांचे वडील महादेव दशरथ मते हे दिनांक 03/07/1997 रोजी मृत्यू पावले.

अर्जदार नं.1 ते 3 हे मयत श्रीमती पार्बताबाई महादेव मते हिचे अनुक्रमे मुलगा आणि मुली असून ते कायदेशीर वारसदार आहेत. त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. उपरोक्त तोंडी पुराव्या जबाबावर आणि दाखल कागदपंत्रावर अविश्वास दाखववावा असे कोणतेच कारण यामितीस मला दिसुन येत नाही. त्यामुळे मयत श्रीमती पार्बताबाई महादेव मते याच्या मृत्यू पश्चात सातव्या वेतन आयोगाप्रमाणे पेंशनच्या फरकाची रक्कम मिळण्याकरिता अर्जदार नं.1 ते 3 यांच्या नावे बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, 1827 नुसार कायदेशीर वारस प्रमाणपत्र जारी करण्यास मला कुठलीही अडचण वाटत नाही. म्हणून, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## **आदेश**

1) अर्ज मंजुर करण्यात येतो.

2) अर्जदार नं.1 ते 3 हे मयत श्रीमती पार्बताबाई महादेव मते हिचे कायदेशीर वारस असल्याबाबत मान्यता देण्यात येते.

3) मयत श्रीमती पार्बताबाई महादेव मते हिचे अर्जदार नं.1 ते 3 हे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्र यथायोग्य न्यायालयीन शुल्क आकारून जारी करण्यात येते.

(एस. बी. गणपा)
दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर),
तुमसर.

दि.10 / 04 / 2023.